# मायक्रोफायनान्स पल्स

अंक VII – नोव्हेंबर 2020



# वैश्लेषिक संपर्क

**इक्वीफॅक्स**

किरण समुद्रला
उपाध्यक्ष - वैश्लेषिकी
kiran.samudrala@equifax.com

श्रुती जोशी
सहाय्यक उपाध्यक्ष - वैश्लेषिकी
shruti.joshi@equifax.com

ख्याती खजुरिया
सहाय्यक प्रबंधक - वैश्लेषिकी
khayati.khajuria@equifax.com

वंदना पांचाळ
वरिष्ठ कार्यकारी- वैश्लेषिकी
vandana.panchal@equifax.com

**सिडबी**

कैलाश चंद्र भानू
मुख्य महाव्यवस्थापक - इआरडीएवी
erdav@sidbi.in

रंगदास प्रभावती
उप महाव्यवस्थापक - इआरडीएवी
erdav@sidbi.in

रमेश कुमार
सहाय्यक प्रबंधक - इआरडीएवी
rameshk@sidbi.in

# अनुक्रमणिका


- कार्यकारी सारांश 03
- संक्षेप आणि शब्दावली 04
- सुक्ष्मवित्त उद्योगाचे अवलोकन 05
- वितरणाचे कल 08
- उद्योग जोखमीची प्रोफाइल 11
- भौगोलीक एक्सपोजर 13
- एमएफआय उद्योग आणि कोवीड-19 16
- महत्त्वाकांक्षी जिल्हे 18
- सर्वसमावेशक राज्य प्रोफाइल: बिहार 21

# कार्यकारी सारांश

आमच्या नव्या वृत्तपत्रात आपले स्वागत आहे. आम्हाला आशा आहे कि, आमच्या सर्व आवृत्ती आपणास मायक्रोफायनान्स उद्योगातील सतत बदलणाऱ्या घडामोडींसंबंधी वेळोवेळी अवगत करित असतात. मायक्रोफायनान्सची 7 वी आवृत्ती वितरण आणि पोर्टफोलिओ कल, उद्योग संबंधित संस्थात्मक विचारधारा व बदलणाऱ्या भौगोलिक गतिशीलतेवर प्रकाश टाकते.

30 सप्टेंबर 2020 पर्यंत मायक्रोफायनान्स उद्योग वर्तमान सुमारे 6 कोटी ऋणकोना सेवा पुरवीत आहे. मायक्रोफायनान्स उद्योगामध्ये पोर्टफोलिओ थकबाकीच्या अनुषंगाने वर्षोगणिक 14% इतकी वृद्धी झाली आहे. मायक्रोफायनान्स उद्योगाची पोर्टफोलिओ थकबाकी 30 सप्टेंबर 2020 पर्यंत रुपये 227844 कोटी इतकी आहे. एसएफबी मध्ये पोर्टफोलिओ थकबाकीच्या अनुषंगाने वर्षोगणिक वृद्धीदर 24% इतका सर्वाधिक आहे. पोर्टफोलिओ थकबाकीत बँकांचे 41% व त्यानंतर एनबीएफसी-एमएफआय चे 31% योगदान आहे.

मायक्रोफायनान्स उद्योगात मंदगतीने सुधारणा होत आहे. जुलै ऑगस्ट सप्टेंबर 2020 मध्ये एकूण 32375 कोटी रुपयांचे 92 लाख कर्ज वितरीत केले गेले जे, एप्रिल मे जून 2020 दरम्यानच्या आकाराच्या तुलनेत 300% तर मूल्याच्या तुलनेत 393% अधिक आहे. 70% हून अधिक कर्जांचे वितरण 10 हजार ते 50 हजार कर्जश्रेणीत झाले आहे. कर्ज वितरणाच्या दृष्टीकोनातून सर्व तिमाहीमध्ये बँकांचे योगदान सर्वाधिक राहीले, त्या नंतर एनबीएफसी-एमएफआय राहील्या आहेत. उद्योगा मधील सरासरी तिकीट आकार (एटीएस) कर्ज जुलै ऑगस्ट सप्टेंबर 2019 ते जुलै ऑगस्ट सप्टेंबर 2020 मध्ये 5% वृद्धी दर्शवित आहे. सर्व तिमाहीमध्ये सप्टेंबर 20 मध्ये एकंदर कसूर दर हा 19.83% इतका सर्वाधिक राहीला आहे.

अखिल भारतीय पोर्टफोलिओ विभागात सर्वोच्च 9 राज्यांचे योगदान 75%हून अधिक आहे. पोर्टफोलिओ थकबाकीत तामीळनाडू आणि पश्चिम बंगाल यांचा वाटा प्रत्येकी 15% इतका आहे. तामिळनाडू आणि पश्चिम बंगाल या दोन राज्यांनी 90+ कसूर अनुक्रमे 0.25% आणि 0.38% इतका योग्य रित्या राखला आहे. महत्त्वाकांक्षी जिल्ह्यांचा वाटा अखिल भारतीय थकबाकीत 12% आणि 90+कसूर हा 0.35 % इतका आहे.

पोर्टफोलिओ थकबाकी(पीओएस) मध्ये 11% अखिल भारतीय वाट्यासह बिहार वरील क्रमाने 3रे राज्य आहे. सप्टेंबर 2020 पर्यंत बिहारचा सरासरी तिकीट आकार (एटीएस) हा रुपये 38209 कोटी आहे, जो अखिल भारतीय सरासरी तिकीट आकाराच्या (एटीएस) 8% अधिक आहे. बिहार मध्ये बँकांचे सरासरी तिकीट आकार कर्ज रुपये 42743 कोटी इतके सर्वाधिक आहे आणि त्याखालोखाल एसएफबी कर्ज रुपये 41457 कोटी इतके आहे. सप्टेंबर 2020 पर्यंत बिहारचा 90+कसूर 0.18% इतका आहे.

कोविड-19 च्या महामारीने जगभरातील प्रत्येक क्षेत्रातले कामकाज विस्कळीत केले आहे. यामुळे मायक्रोफायनान्स संस्थांनाही मंदी अनुभवावी लागली, हे वेगळे सांगण्याची गरज नाही. अग्रेसर 5 राज्यांचे आकार व मुल्यानुसार कर्जवाटप योगदान जुलै ऑगस्ट सप्टेंबर 2019 मध्ये 56% होते, जे जुलै ऑगस्ट सप्टेंबर 2020 मध्ये कोविड महामारीमुळे 52% इतके घसरले. अग्रेसर 5 राज्यांनी जुलै ऑगस्ट सप्टेंबर 2019 मध्ये 103 लाख रुपयांचे कर्ज वितरीत केले. जुलै ऑगस्ट सप्टेंबर '20 मध्ये अग्रेसर 5 राज्यांनी रुपये 49 लाखाचे कर्ज वाटप केले जे जुलै ऑगस्ट सप्टेंबर 2019 मध्ये केलेल्या कर्ज वाटपाच्या तुलनेत 53 % इतके कमी आहे. जुलै ऑगस्ट सप्टेंबर 2019 ते जुलै ऑगस्ट सप्टेंबर 2020 मध्ये वितरण राशीत 50% घट झाली आहे.

# संक्षेप आणि शब्दावली

- एटिएस (सरासरी तिकीट आकार) = वितरीत रक्कम/ कर्जांची संख्या
- डीपीडी = परतावा दिनांक उलटल्यानंतरचे दिवस
- सद्यकालीन प्रोटफोलिओ थकबाकी किंवा सक्रीय कर्ज = 0 ते 179 डीपीडी + नवी खाती + वर्तमान खाती
- एमएफआय = मायक्रोफायनान्स संस्था
- पिओएस = पोर्टफोलिओ थकबाकी
- युटी = केंद्रशासित प्रदेश
- महत्त्वाकांक्षी जिल्हे (एडी) – आरोग्य व आहार, शिक्षण , कृषी आणि जलस्त्रोत, वित्तीय समावेश, कौशल्य विकास आणि पायाभूत सुविधांसारख्या संयुक्त निर्देशकांच्या दृष्टीने मानव विकासांक वृद्धीच्या सुधारणेसाठी जानेवारी 2018 मध्ये नीती आयोग, भारत सरकारने निश्चित केलेले जिल्हे (सध्या संख्येने 117).
- 1-179 = 1 to 179 डीपीडी/ सद्यकालीन पीओएस
- 1-29 = 1 to 29 डीपीडी/ सद्यकालीन पीओएस
- 30-59 = 30 to 59 डीपीडी/ सद्यकालीन पीओएस
- 60-89 = 60 to 89 डीपीडी/ सद्यकालीन पीओएस
- 90-179 = 90 to 179 डीपीडी/ सद्यकालीन पीओएस
- 30+ कसूर = 30-179 डीपीडी/ सद्यकालीन पीओएस
- 90+ कसूर = 90-179 डीपीडी/ सद्यकालीन पीओएस


- जेएएस'19 =जुलै2019 ते सप्टेंबर2019
- ओएनडी'19 = ऑक्टोबर 2019 ते डिसेंबर 2019
- जेएफएम' 20 =जानेवारी 2020 ते मार्च 2020
- एमेजू'20 =एप्रिल 2020 ते जून2020
- जेएएस'=20 =जुलै 2020 ते सप्टेंबर2020

# सुक्ष्मवित्त उद्योगाचे अवलोकन



# सुक्ष्मवित्त उद्योगाचे आशुचित्र – सप्टेंबर 2020 पर्यंत

आलेख-01




| आशुचित्र 30 सप्टेंबर 2020 पर्यंत | बॅंक | एसएफबी | एनबीएफसी-एमएफआय | एनबीएफसी | लाभाकरिता नसणाऱ्या एमएफआय | एकूण उद्योग |
|---|---|---|---|---|---|---|
| अनन्य सक्रीय ऋणको ('000) | 25,320 | 14,423 | 24,729 | 7,791 | 781 | 73,044 |
| सक्रीय कर्ज ('000) | 36,726 | 20,329 | 36,177 | 8,580 | 1,052 | 102,864 |
| पोर्टफोलिओ (` कोटी) | 93,410 | 42,682 | 70,142 | 19,838 | 1,772 | 227,844 |
| वितरीत रक्कम (` कोटी) - जेएएस'20 | 17,301 | 4,411 | 9,051 | 1,172 | 440 | 32,375 |
| सरासरी तिकीट आकार (`) -जेएएस'20 | 38,862 | 31,678 | 31,956 | 32,006 | 29,719 | 35,225 |
| 30+ कसूर (पीओएस) | 6.03% | 2.79% | 4.21% | 2.04% | 1.34% | 4.48% |
| 90+ कसूर (पीओएस) | 0.39% | 0.26% | 1.25% | 0.35% | 0.53% | 0.63% |

कोष्टक-01


- 30 सप्टेंबर 2020 पर्यंत मायक्रोफायनान्स उद्योगात पोर्टफोलिओ थकबाकी राशी रुपये 227844 कोटी इतकी आहे ज्यामध्ये, 41% बाजारी वाटा बँकांचा असून त्या मायक्रोफायनान्स उद्योगाचे नेतृत्व करित आहेत.
- जुलै ऑगस्ट सप्टेंबर 2020 तिमाही मधील वितरण राशी टाळेबंदी तिमाही एप्रिल मे जून 2020 च्या तुलनेत तिमाहीगणिक [QoQ] 393% वृद्धी नोंदवून 32375 कोटी रुपये इतकी होती. जून2020 मध्ये 6040 कोटी रुपयांचे कर्जवाटप झाले. ते वाढून सप्टेंबर 2020 मध्ये 12724 कोटी इतके झाले.
- जुलै ऑगस्ट सप्टेंबर 2020 तिमाही दरम्यान झालेल्या वितरण वृद्धिमध्ये बँकांचा वाटा 53% असून त्या सर्वात अग्रेसर आहेत.
- कोविड-19 प्रेरित कालावधी दरम्यान जुलै ऑगस्ट सप्टेंबर 20 मधील सरासरी तिकीट आकार [एटीएस] हा जानेवारी फेब्रुवारी मार्च 2020 एटीएस उद्योगाच्या च्या तुलनेत 96% वसुली दर्शवितो.
- 30 सप्टेंबर 2020 पर्यंत बँकांनी एटीएस उद्योग रुपये 38,862 कोटी इतका राखला, जो पूर्वीच्या बँक एटीएस उद्योग 35,225 कोटीच्या तुलनेत 10% अधिक होता.
- एनबीएफ़सी एमएफआय ने सप्टेंबर 2020 पर्यंत 90+ कसूर सर्वाधिक 1.25% इतका नोंदविला आहे.

टीप: एमएफआय विभागात ~6कोटी अनन्य वर्तमान ऋणको आहेत. ग्राहकांच्या एसएफबी, बँक, एनबीएफसी-एमएफआय , एनबीएफसी आणि लाभासाठी नसणाऱ्या एमएफआयशी असणाऱ्या बहुविध संबंधामुळे ग्राहकांच्या अनन्य क्रमांकामध्ये फरक आहे.

# मायक्रोफायनान्स उद्योगाचे अवलोकन

आलेख-02

कर्जदाता प्रकारानुसार बाजारांशाचा कल




पोर्टफोलिओ थकबाकी (`कोटी)

| तपशील | सप्टे'19 | डिसे'19 | मार्च'20 | जून'20 | सप्टे'20 |
|---|---|---|---|---|---|
| बँक | 80,526 | 83,725 | 90,643 | 91,922 | 93,410 |
| एसएफबी | 34,290 | 36,639 | 40,539 | 39,225 | 42,682 |
| एनबीएफसी-एमएफआय | 63,394 | 67,104 | 74,771 | 71,342 | 70,142 |
| एनबीएफसी | 19,508 | 19,415 | 20,225 | 19,875 | 19,838 |
| लाभाकरिता नसणाऱ्या एमएफआय | 1,970 | 1,802 | 1,896 | 1,841 | 1,772 |
| एकूण उद्योग | 199,688 | 208,686 | 228,074 | 224,205 | 227,844 |
| तिमाहीगणिक वृद्धी दर % | - | 5% | 9% | -2% | 2% |

कोष्टक-02

- सप्टेंबर 2019 ते सप्टेंबर 2020 मध्ये मायक्रोफायनान्स उद्योग 14%नी वाढला आहे.
- सप्टेंबर 2019 ते सप्टेंबर 2020 मध्ये 24% वर्षागणिक वृद्धी आणि जून 2020 ते सप्टेंबर 2020 मध्ये 9% तिमाहीगणिक वृद्धीसह एसएफबीने सर्वाधिक पोर्टफोलिओ वृद्धी केली.
- जून 2020 मध्ये नवीन कर्ज मागणी मध्ये कमी आल्याने पोर्टफोलिओ थकबाकीमध्ये घसरण दिसून आली, ज्याला कारणीभूत महामारीमुळे झालेली टाळेबंदी असू शकते.


# वितरणाचे कल



## वितरणाचे कल – संस्था निहाय

आलेख-03

कर्जदाता प्रकारानुसार बाजारांशाचा कल




वितरीत कर्जांची संख्या (लाखांमध्ये)

| धनको प्रकार | जेएएस' '19 | ओएनडी '19 | जेएफएम '20 | एएमजे '20 | जेएएस'20 |
|---|---|---|---|---|---|
| बँक | 68 | 74 | 83 | 14 | 45 |
| एसएफबी | 31 | 33 | 33 | 6 | 14 |
| एनबीएफसी-एमएफआय | 70 | 70 | 72 | 2 | 28 |
| एनबीएफसी | 13 | 12 | 11 | 0 | 4 |
| लाभाकरिता नसणाऱ्या एमएफआय | 2 | 3 | 2 | 1 | 1 |
| एकूण उद्योग | 184 | 192 | 201 | 23 | 92 |

कोष्टक-03


- देशव्यापी टाळेबंदीमुळे एप्रिल मे जून 2020 मधील वितरण 6565 कोटी रुपये इतकं घटलं.
- टाळेबंदीच्या काळात बँक आणि एसएफबीनी कर्जवाटपात अनुक्रमे 67% व 22% इतके सर्वाधिक योगदान दिलं.
- जुलै ऑगस्ट सप्टेंबर 2020 मध्ये पर्याप्त वसुली झाल्याने मुल्यानुसार वितरणात एप्रिल मे जून 2020 ते जुलै ऑगस्ट सप्टेंबर मध्ये 393% वाढ दिसून आली. यात बँकांनी 53% आणि एनबीएफ़सीनी 28% वसुली करून आपले वर्चस्व सिद्ध केले. तथापि, टाळेबंदीपूर्व तिमाही ( जानेवारी फेब्रुवारी मार्च 2020) च्या तुलनेत जुलै ऑगस्ट सप्टेंबर 2020 या तिमाहीतील मूल्यानुसार कर्जवाटप हे 44% इतके होते.
- एप्रिल मे जून 2020 ते जुलै ऑगस्ट सप्टेंबर 2020 पर्यंत आकारानुसार वितरण वाढीत 300% वृद्धी नोंदवली गेली.

टीप: वितरण कल हे 30 सप्टेंबर 2020 पर्यंतची ब्युरोकडे प्रस्तुत केलेली अद्यतनित माहीती आहे.

# उद्योग तिकीट आकाराचे कल

आलेख-04

वितरीत कर्जांची संख्या (लाखांमध्ये)




वितरीत कर्ज संख्या (लाखांमध्ये )

| तिकीट आकार | जेएएस '19 | ओएनडी '19 | जेएफएम '20 | एएमजे '20 | जेएएस '20 | वर्षागणिक वृद्धीदर % |
|---|---|---|---|---|---|---|
| 0K-10K | 11 | 10 | 9 | 2 | 4 | -64% |
| 10K-20K | 14 | 13 | 12 | 11 | 16 | 14% |
| 20K-30K | 50 | 48 | 46 | 2 | 17 | -66% |
| 30K-40K | 60 | 62 | 63 | 3 | 21 | -65% |
| 40K-50K | 25 | 29 | 33 | 2 | 16 | -36% |
| 50K-60K | 10 | 15 | 19 | 2 | 9 | -10% |
| 60K Plus | 13 | 15 | 19 | 2 | 9 | -31% |
| एकूण | 184 | 192 | 201 | 23 | 92 | -50% |
| तिमाहीगणिक कर्ज वितरण वृद्धी दर % | - | 4% | 5% | -89% | 300% | - |
| अखिल भारतीय एटीएस (`) | 33,404 | 34,814 | 36,748 | 28,059 | 35,225 | 5% |
| तिमाहीगणिक एटीएस वृद्धी दर % | - | 4% | 6% | -24% | 26% | - |

कोष्टक-04

- टाळेबंदीच्या काळात किंवा एप्रिल मे जून 2020 तिमाहीत 10K -20K तिकीट आकाराच्या कर्जाची मागणी वाढली, ज्यांचा बाजारातील वाटा 47% इतका होता.
- इतर तिकीट आकार कर्जांमध्ये 10K -20K तिकीट आकाराच्या कर्जश्रेणीत वर्षागणिक 14% इतकी सर्वाधिक वाढ नोंदविली.
- जुलै ऑगस्ट सप्टेंबर 2020 या तिमाहीत उद्योग सरासरी तिकीट आकार कर्जामध्ये (एटीएस) वर्षागणिक वाढ 5% झाली.
- एप्रिल मे जून 2020 ते जुलै ऑगस्ट सप्टेंबर 2020 काळात तिमाहीगणिक उद्योग सरासरी तिकीट आकारामध्ये 26% इतकी वाढ झाली. हा तिमाही वृद्धी दर सरासरी 4% ते 6% इतका आहे.


# उद्योग जोखमीची प्रोफाइल



## उद्योग जोखमीची प्रोफाईल

आलेख -05

गतकालिक बाकीचा कसूर




गतकालिक बाकीचा कसूर

| सादरकर्ती तिमाही | 1-29 दिवस बाकी देय | 30-59 दिवस बाकी देय | 60-89 दिवस बाकी देय | 90-179 दिवस बाकी देय | 1-179 दिवस बाकी देय |
|---|---|---|---|---|---|
| सप्टे'19 | 1.31% | 0.38% | 0.24% | 0.43% | 2.36% |
| डिसे'19 | 1.79% | 0.70% | 0.37% | 0.54% | 3.40% |
| मार्च'20 | 3.72% | 0.49% | 0.41% | 0.87% | 5.49% |
| जून'20 | 1.30% | 1.03% | 0.43% | 0.43% | 3.20% |
| सप्टे'20 | 15.35% | 3.47% | 0.39% | 0.63% | 19.83% |

कोष्टक-05

- उद्योग 1+ कसूर सप्टेंबर 2020 मध्ये 19.83% या शिखरावर पोचला.
- कसूर कोश 1-29 दिवसांची देय बाकी आणि 30-59 दिवसांची देय बाकी मध्ये 14.05% व 2.44 % ची भरीव वाढ जून 2020 च्या तुलनेत सप्टेंबर 2020 मध्ये दिसून आली.

कसूर परिगणनाधारित पोर्टफोलिओ थकबाकी.


# भौगोलीक एक्सपोजर



MicrofinancePulse

# सप्टेंबर 2020 पर्यंतची राज्य/ केंद्रशासित प्रदेशनिहाय पोर्टफोलिओ थकबाकी

नकाशा-01





हा नकाशा केवळसामान्य चित्रण असून कुठल्याही संदर्भाच्या उद्देशाने त्याचा वापर करण्यात येऊ नये.

टीप: हा नकाशा 30 सप्टेंबर 2020 पर्यंत प्रस्तुत केलेल्या संस्थांच्या माहीतीवर आधारित आहे. संपूर्ण जम्मू आणि काश्मीर राज्यासाठी सादर केल्या गेलेल्या माहीतीच्या आधारावर जम्मू आणि काश्मीर राज्याच्या माहीतीचे प्रस्तुतीकरण आहे.

- सप्टेंबर 2020 पर्यंतची अखिल भारतीय पोर्टफोलिओ थकबाकी रुपये 227844 कोटी आहे.
- अखिल भारतीय पोर्टफोलिओला 75%हून अधिक योगदान सर्वोच्च 9 राज्ये देतात (तामिळनाडू , पश्चिम बंगाल, बिहार, कर्नाटक, महाराष्ट्र, उत्तरप्रदेश, मध्यप्रदेश, ओडिशा, आसाम)
- बहुतांश भारतीय राज्यांची पोर्टफोलिओ थकबाकी एक्स्पोजर हे रुपये 5000 कोटींपेक्षा अधिक आहे.

## सप्टेंबर2020 पर्यंत राज्य/ केंद्रशासित प्रदेशनिहाय 90+ कसूर

नकाशा-02





हा नकाशा केवळ सामान्य चित्रण असून कुठल्याही संदर्भाच्या उद्देशाने त्याचा वापर करण्यात येऊ नये.

टीप: हा नकाशा 30 सप्टेंबर 2020 पर्यंत प्रस्तुत केलेल्या संस्थांच्या माहितीवर आधारित आहे. संपूर्ण जम्मू आणि काश्मीर राज्यासाठी सदर केल्या गेलेल्या माहितीच्या आधारावर जम्मू आणि काश्मीर राज्याच्या माहितीचे प्रस्तुतीकरण आहे.

- सप्टेंबर'20 मध्ये अखिल भारतीय 90+ कसूर 0.63% आहे.
- अग्रेसर एमएफआय राज्ये – पश्चिम बंगाल, तामीळनाडू आणि बिहार यांनी 90+ कसूर , अखिल भारतीय 90+ कसूरच्या तुलनेत, चांगल्या प्रकारे कमी राखला आहे.

# एमएफआय उद्योग आणि कोवीड-19



# एमएफआय उद्योग आणि कोविड-19चा प्रभाव

| अग्रेसर 5 राज्ये | जेएएस '19 (वितरीत खात्यांची संख्या लाखांमध्ये) | जेएएस '20 (वितरीत खात्यांची संख्या लाखांमध्ये) | % वृद्धी | 23 सप्टेंबर 2020 पर्यंतचे एकूण कोविड-19 प्रकरणं |
|---|---|---|---|---|
| तामिळनाडू | 27 | 13 | -51% | 552,674 |
| पश्चिम बंगाल | 22 | 11 | -47% | 231,484 |
| बिहार | 20 | 9 | -56% | 172,854 |
| कर्नाटक | 19 | 9 | -54% | 533,850 |
| महाराष्ट्र | 15 | 6 | -58% | 1,242,770 |

कोष्टक-06

| अग्रेसर 5 राज्ये | जेएएस '19 (वितरीत रक्कम कोटीमध्ये) | जेएएस '20 (वितरीत रक्कम कोटीमध्ये) | % वृद्धी | 23 सप्टेंबर 2020पर्यंतचे एकूण कोविड-19 प्रकरणं |
|---|---|---|---|---|
| तामिळनाडू | 8,845 | 3,980 | -55% | 552,674 |
| पश्चिम बंगाल | 9,225 | 5,057 | -45% | 231,484 |
| बिहार | 6,810 | 3,441 | -49% | 172,854 |
| कर्नाटक | 5,004 | 2,766 | -45% | 533,850 |
| महाराष्ट्र | 4,377 | 1,974 | -55% | 1,242,770 |

कोष्टक-07

- अग्रेसर 5 राज्यांचे कर्ज आकार आणि मुल्यानुसार वितरणातील योगदान हे जुलै ऑगस्ट सप्टेंबर 2019 मध्ये 56% होते. जे जुलै ऑगस्ट सप्टेंबर 2020 मध्ये महामारीमुळे 52% पर्यंत घसरले.
- अग्रेसर 5 राज्यांनी 103 लाख कर्जांचे वितरण केले. जुलै ऑगस्ट सप्टेंबर 2020 मध्ये अग्रेसर 5 राज्यांचे वितरण 49 लाख कर्जे इतके आहे. जे जुलै ऑगस्ट सप्टेंबर 2019 पेक्षा 53%ने कमी आहे.
- जुलै ऑगस्ट सप्टेंबर 2019 ते जुलै ऑगस्ट सप्टेंबर 2020 मध्ये अग्रेसर 5 राज्यांची वितरण राशी 50% इतकी खाली आली आहे.

कोविड-19 माहीती स्त्रोत: https://www.mygov.in/covid-19


# महत्त्वाकांक्षी जिल्हे




MicrofinancePulse

## महत्त्वाकांक्षी जिल्हे – सप्टेंबर 2020 अवलोकन

आलेख -06




आलेख -07




| महत्त्वाकांक्षी जिल्ह्यांचे वृद्धी विवरण | डिसेंबर 2017 | सप्टेंबर 2020 | वृद्धी % |
|---|---|---|---|
| सक्रीय ग्राहक प्रवेश ('000) | 4,155 | 7,308 | 76% |
| वितरण राशी (`कोटी) | 14,374* | 22,659** | 58% |
| सक्रीय कर्जे ('000) | 6,925 | 12,654 | 83% |
| पोर्टफोलिओ थकबाकी (`कोटी) | 11,175 | 26,726 | 139% |
| 30+ कसूर | 1.54% | 3.02% | - |
| 90+ कसूर | 0.75% | 0.35% | - |

कोष्टक-08

- महत्त्वाकांक्षी जिल्ह्यांमध्ये बँकांच्या 42% वाट्या बरोबर एकूण थकबाकी 26726 कोटी रुपये आहे व त्याखालोखाल एनबीएफसीचा 35% वाटा आहे.
- महत्त्वाकांक्षी जिल्ह्यांमध्ये सर्वाधिक 90+ कसूर एनबीएफसी-एमएफआयचा आहे.
- डिसेंबर 2017 ते सप्टेंबर 2020 दरम्यान पोर्टफोलिओ थकबाकी 139% वाढली आणि वितरण राशीत 58%ची वाढ झाली.

.* वितरण: जानेवारी 2017 ते डिसेंबर 2017


** वितरण: ऑक्टोबर 2019 ते सप्टेंबर 2020.

कसूर हे परिगणनाधारित पोर्टफोलिओ थकबाकी आहेत.

## महत्त्वाकांक्षी जिल्हे – ग्राहक आणि भूगोल प्रसार

आलेख -08

पिओएस कोशानुसार ग्राहक वितरण – महत्त्वाकांक्षी जिल्हे




| जिल्हा | राज्य | पिओएस (`कोटी) सप्टेंबर 2020 | सक्रीय खाती ('000) सप्टेंबर 2020 | सक्रीय संस्था *संख्या सप्टेंबर 2020 | सक्रीय ऋणको ('000) सप्टेंबर 2020 | 90+ पिओएस कसूर सप्टेंबर 2020 |
|---|---|---|---|---|---|---|
| मुजफ्फरपूर | बिहार | 1,707 | 793 | 65 | 503 | 0.28% |
| बेगुसराय | बिहार | 1,261 | 575 | 62 | 338 | 0.27% |
| पूर्णिया | बिहार | 983 | 433 | 51 | 258 | 0.07% |
| औरंगाबाद | महाराष्ट्र | 950 | 461 | 59 | 227 | 0.76% |
| दाहोद | गुजरात | 785 | 394 | 38 | 218 | 0.06% |
| अररिया | बिहार | 754 | 341 | 56 | 208 | 0.05% |
| सीतामढी | बिहार | 746 | 357 | 41 | 207 | 0.01% |
| कटिहार | बिहार | 745 | 332 | 47 | 196 | 1.05% |
| विरुदुनगर | तामीळनाडू | 743 | 387 | 48 | 195 | 0.40% |
| रामनाथपुरम | तामीळनाडू | 611 | 307 | 53 | 163 | 0.10% |

कोष्टक-09

- महत्त्वाकांक्षी जिल्ह्यातील कर्जदारांना 10K ते 50K पिओएस श्रेणीत केंद्रित केले आहे.
- सप्टेंबर 2020 पर्यंत पोर्टफोलिओ थकबाकी आधारित बिहारचे 5 हून अधिक जिल्हे आहेत जे अग्रेसर 10 महत्वाकांक्षी जिल्हाचा भाग आहेत.
- मुजफ्फरपूरचे योगदान अग्रेसर 10 महात्वाकांक्षी जिल्ह्यांच्या पोर्टफोलिओ थकबाकीमध्ये 18% इतके आहे. या खालोखाल बेगुसराय 14% आणि पूर्णिया 11% आहेत.
- सप्टेंबर 2020 पर्यंत अग्रेसर 10 महत्त्वाकांक्षी जिल्ह्यांपैकी सीतामढीने 90+ कसूर 0.01% इतका नोंदवला. जो, महत्त्वाकांक्षी जिल्ह्यांमधील न्यूनतम आहे.


* एकाधिक भौगोलिक क्षेत्रांमध्ये कार्यरत संस्थांमुळे काही द्विगुणन असण्याची शक्यता आहे.

# सर्वसमावेशक राज्य प्रोफाइल: बिहार


MicrofinancePulse

## बिहार: राज्य अवलोकन

आलेख -09





| बिहार सप्टेंबर 2020 पर्यंतचे आशुचीत्र दृश्य | बँक | एसएफबी | एनबीएफसी-एमएफआय | एनबीएफसी | लाभाकरिता नसणाऱ्या एमएफआय | एकूण उद्योग |
|---|---|---|---|---|---|---|
| सक्रीय कर्ज ('000) | 4,468 | 1,446 | 4,055 | 1,131 | 322 | 11,422 |
| पोर्टफोलिओ (`कोटी) | 10,577 | 3,380 | 7,577 | 2,712 | 592 | 24,838 |
| पोर्टफोलिओ थकबाकीतील बाजार हीस्सा | 43% | 14% | 30% | 11% | 2% | 100% |
| वितरीत राशी (`कोटी) – जेएएस '20 | 1,934 | 302 | 832 | 207 | 166 | 3,441 |
| सरासरी तिकीट आकार (`) – जेएएस '20 | 42,743 | 41,457 | 31,030 | 34,944 | 34,653 | 38,209 |
| 30+ कसूर (पिओएस) | 1.73% | 1.09% | 2.49% | 0.12% | 0.63% | 1.67% |
| 90+ कसूर (पिओएस) | 0.06% | 0.06% | 0.45% | 0.01% | 0.22% | 0.18% |

कोष्टक-10

- सक्रीय कर्ज आणि पोर्टफोलिओ थकबाकीच्या दृष्टीने बिहारचे योगदान अखिल भारतीय एमएफआय पोर्टफोलिओसाठी 11% आहे.
- बिहारचा सरासरी तिकीट आकार हा जुलै ऑगस्ट सप्टेंबर 2020च्या अखिल भारतीय सरासरी तिकीट आकारापेक्षा 8% अधिक आहे.
- 30 सप्टेंबर 2020 पर्यंतच्या अखिल भारतीय स्तरावरील कसुराच्या तुलनेत बिहारचा 90+ कसूर चांगल्या प्रकारे राखल्या गेला आहे.
- पोर्टफोलिओ थकबाकीत बँकेचे योगदान 43% इतके आहे, जे सर्व धनकोंमध्ये सर्वाधिक आहे.
- बिहार मध्ये बँकांचा वाटा सरासरी तिकीट आकार कर्जामध्ये रुपये 42743 कोटी इतका आहे. त्याखालोखाल एसएफबीचा 41457 कोटी इतका आहे.
- एनबीएफसीनी इतर धनकोंच्या तुलनेत 30+ आणि 90+ कसूर चांगल्या प्रकारे राखला आहे.

# बिहार: वितरण कल – संस्थानिहाय

आलेख -10




वितरीत कर्जांची संख्या (`000 मध्ये)


| तपशील | जेएएस '19 | ओएनडी '19 | जेएफएम '20 | एएमजे '20 | जेएएस'20 |
|---|---|---|---|---|---|
| बँक | 852 | 946 | 1,083 | 209 | 452 |
| एसएफबी | 236 | 278 | 333 | 17 | 73 |
| एनबीएफसी-एमएफआय | 724 | 827 | 913 | 14 | 268 |
| एनबीएफसी | 177 | 173 | 162 | 1 | 60 |
| लाभाकरिता नसणाऱ्या एमएफआय | 40 | 68 | 66 | 48 | 48 |
| एकूण उद्योग | 2,029 | 2.292 | 2.557 | 289 | 901 |

कोष्टक-11


- जुलै ऑगस्ट सप्टेंबर 2019च्या तुलनेत जुलै ऑगस्ट सप्टेंबर 2020 मध्ये महामारीचा प्रभाव अधिक आहे. जुलै ऑगस्ट सप्टेंबर '19 ते जुलै ऑगस्ट सप्टेंबर '20 मध्ये वितरण राशी 49% खालावली आहे.
- जुलै ऑगस्ट सप्टेंबर 2019 ते जुलै ऑगस्ट सप्टेंबर 2020 मध्ये कर्ज प्रवृत्ती 56% नी खालावली आहे.
- सर्व तिमाहींमध्ये बँकांचे कर्जाच्या उलाढालीतील योगदान सर्वाधिक आहे. त्या खालोखाल एनबीएफसी-एमएफआय आहेत.
- जुलै ऑगस्ट सप्टेंबर 2020 मध्ये बँकांचे कर्जाचे योगदान 50% आहे, त्या खालोखाल एनबीएफसी-एमएफआय चे 30% आहे.
- जुलै ऑगस्ट सप्टेंबर 2020 मध्ये कर्ज प्रवृत्तीत 212% इतकी वृद्धी एप्रिल मे जून 2020 पासून झाली आहे.

# बिहार: भौगोलिक पोर्टफोलिओ योगदान

आलेख -11






आलेख -12




- सप्टेंबर 2020 मध्ये पोर्टफोलिओ थकबाकीत बिहारच्या ग्रामीण भौगोलिक क्षेत्राचे योगदान 59% आहे. त्या खालोखाल अर्ध नागरी क्षेत्रांचे 39% आणि नागरी क्षेत्राचे 2% इतके आहे.
- सर्व भौगोलिक क्षेत्रांमध्ये पोर्टफोलिओ थकबाकीत बँकांचे योगदान सर्वाधिक आहे
- राज्याच्या 90+ पिओएस कसुर तुलनेत नागरी भौगोलिक क्षेत्र 90+ पिओएस कसूर अधिक प्रमाणात प्रतिबिंबित करते.

## बिहार: ऋणको वितरण




- बिहारच्या एकूण ऋणकोंपैकी 41% ऋणकोंकडे 2 एमएफआय कर्जापेक्षा अधिक कर्ज आहे.
- पिओएस द्वारे ऋणकोंची विभागणी असे दर्शविते की, 65% ऋणको हे 10K ते 50K श्रेणीत मोडतात.

## सिडबी बद्दल

भारतीय लघुउद्योग विकास बँकेची (सिडबी) स्थापना 1990 साली संसदेच्या अधिनियमान्वये झाली. सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योगक्षेत्राच्या (एमएसइ) प्रोत्साहन, वित्तपुरवठा आणि विकासाची तिहेरी कार्यावली आमलात आणण्यासाठी आणि तत्सम कार्ये करणाऱ्या संस्थांमध्ये समन्वय साधण्यासाठी सिडबीला प्रमुख वित्तीय संस्था म्हणून कार्य करण्यासाठी अधिकृत केले आहे. इतक्या वर्षांमध्ये तिच्या विविध वित्तीय आणि विकासाच्या उपायांद्वारे बँकेने समाजाच्या विविध स्तरांतील लोकांच्या जिवनात स्थान मिळविले आहे, तिने एमएसएमइ च्या समग्र वर्णपटातील उपक्रमांवर प्रभाव टाकला आहे आणि एमएसएमइ च्या परिसंस्थेतील अनेक विश्वासार्ह संस्थांशी सलग्न झाली आहे.

व्हिजन 2.0 अंतर्गत सिडबीने एमएसएमइ विभागाच्या माहीतीची विषमता संबोधित करताना एमएसएमइ पल्स, एमएसएमइ चे आणि क्रिसायडेक्स चे हेल्थ ट्रॅकर, एमएसइ भावना व आकांक्षांचे मापन, इंडस्ट्री स्पॉटलाईट आणि उद्योगक्षेत्रांवर एक सर्वंकष अहवाल आणि फिन्टेक पल्स, मायक्रोफायनान्स पल्स शिवाय फिटनेस लेंडिंग विभागावरील क्रेडीट डेटा अंतर्दृष्टी अशा अनेक उपक्रमांचे नेतृत्व केले.

## मायक्रोफायनान्स क्षेत्रामध्ये सिडबी

मायक्रोफायनान्स चळवळीला पाठींबा देत समावेशक वित्तविषयक कार्यावली पुढे नेण्यासाठी सिडबीने अग्रणी भूमिका बजावली आहे. मायक्रोफायनान्स अंतर्गत, मार्च 2020 पर्यंत बँकेने 100 हून अधिक एमएफआयना रुपये 19871 कोटी एकत्रितपणे मंजूर केले आहेत. एमएफआयना वित्त पुरवठा आणि समन्यायी पाठबळ देण्यासह या संस्थांना क्षमता बांधणीचा आधार देऊन अनुपालन मूल्यांकनाच्या साधनांद्वारे कॉर्पोरेट संस्कृती आत्मसात करण्यात सिडबीची भूमिका अग्रणी राहीली आहे. मायक्रोफायनान्स उद्योगाच्या सुरवातीच्या नाजूक काळात हातात हात घेऊन तो पूर्णपणे विकसित उद्योग विभाग होण्यापर्यन्तचे पूरक समर्थन, आमच्या 8 भागीदार एमएफआयना एसएफबीज्/ युनिवर्सल बँक्सचे संक्रमणात संचयन करणे. बाजारभावापेक्षा बऱ्यापैकी कमी व्याजदरात थेट सिडबी कडून (भागीदारी करारा द्वारे ) लघु कर्जांची उपलब्धता करण्याचा सूक्ष्म कर्ज पुरवठ्यातील पथदर्शी पुढाकार. 'प्रयास' या शीर्षकांतर्गत पिरॅमीडच्या पायथ्याशी असणाऱ्या सूक्ष्म ऋणकोंसाठी बाजारभावापेक्षा तुलनेने कमी व्याजदरात भागीदारी मॉडेल अंतर्गत 0.5 लाख ते 5 लाख पर्यंतच्या लघु तिकीट आकाराच्या कर्जांचा विस्तार सिडबी बँक करत आहे.

## इक्विफॅक्स बद्दल

इक्विफॅक्स ही एक ग्लोबल इन्फोर्मेशन सोल्युशन्स कंपनी आहे. जी विश्वासार्ह, अद्वितीय माहीतीचा वापर सर्जनशील पृथक्करणात, तंत्रज्ञान आणि उद्योग कौशल्याचा उपयोग जगातील व्यक्ती व संस्थांना ज्ञानाचे अंतर्दृष्टीत रुपांतर करून देण्यात करते. जे वैयक्तिक निर्णयात आणि माहीतीपूर्ण व्यवसायात मदत करतात.

ॲटलांटा (जॉर्जिया, यूएसए) येथे मुख्यालय असलेली इक्विफॅक्स ही उत्तर अमेरिका, मध्य व दक्षिण अमेरिका, युरोप व आशिया पॅसीफीक विभागातील 24 देशांमध्ये गुंतवणूक व संचालन करते. स्टॅण्डर्ड ॲण्ड पुअर (एस ॲण्ड पी) 500® निर्देशकांची इक्विफॅक्स सदस्य असून सामान्य भागांचा (कॉमन स्टॉक) न्युयॉर्क स्टॉक एक्स्चेंज (एनएसवायइ) मध्ये व्यापार होतो. EFX या चिन्हाखाली इक्विफॅक्सचे जगभरात 11,000 कर्मचारी आहेत. पत उद्योगातील 120 वर्षांच्या जागतिक अनुभवाच्या वारश्यासह इक्विफॅक्सने 2010 मध्ये भारतात आपली उपस्थिती प्रस्थापित केली आणि CIC काम करण्यासाठी तिला आरबीआयने परवाना दिला. मागील 9 वर्षात बँक, एनबीएफसी , एमएफआय आणि विमाकारांच्या समावेशासह 4000+ इतका क्रेडीट ब्युरो वाढला. हे सदस्य लक्षावधी भारतीय ग्राहकांची जनसंख्या आधारित आणि परतफेडीची माहीती प्रदान करतात. 2014 मध्ये इक्विफॅक्सने भारतात आपल्या पाऊलखुणा विश्लेषक व्यवसाय संस्थेच्या अधिग्रहणातुन वाढविल्या. इक्विफॅक्स ॲनालायटिक्स प्रायव्हेट लिमिटेड ही इक्विफॅक्सच्या संपूर्ण मालकीची स्वतंत्र संस्था आहे. जी, अद्वितीय सानुकुलीत विश्लेषक उपाय प्रदान करते. जे ग्राहकांचे जिवन आणि व्यावसायिक कामगीरी संपन्न करते.

**अस्वीकरण**

मायक्रोफायनान्स पल्स (अहवाल) इक्विफॅक्स क्रेडीट इन्फोर्मेशन सर्विसेस प्रायव्हेट लिमिटेड (इक्विफॅक्स) द्वारा तयार करण्यात आले. या अहवालाच्या वापराद्वारे वापरकर्ता या अस्वीकारानाच्या आधीन राहून त्याची स्वीकृती देतो. इक्विफॅक्सचे ज्या सभासद आहेत त्या मायक्रोफायनान्स संस्थांच्या सप्टेंबर 2020 च्या पर्याप्त माहीती प्रदानावर आणि त्या माहीतीच्या सविस्तर तौलनिक प्रक्रियेवर आधारित हा अहवाल आहे. इक्विफॅक्स अहवाल तयार करताना पुरेशी काळजी घेत असते. परंतु मायक्रोफायनान्स संस्थांनी सदर केलेल्या अयोग्य व चुकीच्या माहीतीमुळे अहवालात उद्भवत असलेल्या चुकांबाबत/ त्रुटींबाबत इक्विफॅक्स उत्तरदायी असू शकत नाही. शिवाय, इक्विफॅक्स अहवालातील माहीतीच्या पूर्णतेची किंवा पर्याप्ततेची आणि/ किंवा कुठल्याही विशीष्ट उद्देशासाठीच्या त्याच्या उपयुक्ततेची हमी देत नाही. किंवा, अहवालाच्या कुठल्याही उपयोगासाठी इक्विफॅक्स उत्तरदायी नाही आणि इक्विफॅक्स अशा सर्व उत्तरदायित्वाचा स्पष्टपणे अस्वीकार करते. हा अहवाल कुठल्याही उपयोजन, उत्पादन/ परिणामाच्या नकार/ अस्वीकृती अथवा स्वीकृतीची अनुशंसा करत नाही किंवा इक्विफॅक्स i) कर्जाऊ देणे वा न देणे ii) व्यक्ती संबंधित/ संस्था संबंधित कुठल्याही आर्थिक व्यवहारात उतरणे वा न उतरण्याची अनुशंसाही करत नाही. या अहवालातील माहीती कुठल्याही प्रकारचा सल्ला स्थापित करत नाही आणि या अहवालातील माहीतीच्या आधारे कुठल्याही प्रकारचा निर्णय घेण्यापूर्वी वापरकर्त्याने त्याच्या मते योग्य असणारे सर्व आवश्यक विश्लेषण केले पाहीजे. क्रेडीट इन्फोर्मेशन कंपनीज् (नियंत्रण) कायदा 2005, क्रेडीट इन्फोर्मेशन कंपनीज् (2006), क्रेडीट इन्फोर्मेशन कंपनीज् नियम (2006) मधील तरतुदिंद्वारा या अहवालाचा वापर नियंत्रित केला जातो. पूर्व परवानगी शिवाय या अहवालाच्या कुठल्याही भागाच्या प्रती तयार, वितरित व प्रकाशित करू नये.

इंग्रजीतुन मराठीत केलेल्या भाषांतरात काही अस्पष्टता/ तफावत आढळल्यास, इंग्रजीतील संबंधित मजकुर/ संदर्भ ग्राह्य धरला जाईल.

## संपर्क तपशील

इक्वीफॅक्स क्रेडीट इन्फॉर्मेशन सर्विसेस प्रायवेट लिमिटेड

युनिट क्र.931, 3रा मजला, बिल्डींग/ इमारत क्र. 9,
सॉलीटेअर कॉर्पोरेट पार्क, अंधेरी घाटकोपर लिंक रोड,
अंधेरी (पूर्व), मुंबई - 400 093

टोलफ्री क्र.: 1800 2093247
ecissupport@equifax.com

भारतीय लघुउद्योग विकास बॅन्क (सिडबी)

स्वावलंबन भवन, प्लॉट नं. सी-11, 'जी' ब्लॉक,
बांद्रा कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व),
मुंबई - 400 051 महाराष्ट्र

टोलफ्री क्र.: 1800 226753
www.sidbi.in/en

प्रकाशन अधिकार© 2020, इक्विफॅक्स इंकॉर्पोरेशन ॲटलांटा, जॉर्जिया. सर्व हक्क राखीव. इक्विफॅक्स हे इक्विफॅक्स (इंक.)चे नोंदणीकृत व्यापारचिन्ह आहे.